# प्रेसनोट

दि. १३/०१/२०२१

**“पिंपरी चिंचवड मधील हॉटेलमधून डेबिट कार्डचा डेटा चोरुन त्याद्वारे क्लोन कार्ड तयार करुन बिहार आणि झारखंड येथून पैसे काढणारी आंतरराज्यीय टोळी सायबर सेलकडून उघड ”**

याबाबत अधिक माहिती की, सायबर सेल, गुन्हे शाखा, पिंपरी चिंचवड येथे कार्ड क्लोनींगच्या संदर्भाने तक्रारी प्राप्त झाल्या होत्या ज्यामध्ये संबंधित तक्रारदार यांचे डेबिट कार्ड त्यांचे स्वतःकडे असूनदेखील त्यांचे डेबिटकार्डद्वारे बिहार आणि झारखंड या राज्यांतून ए.टी.एम. विड्रॉलद्वारे पैसे काढण्यात आले होते. यावरून पिंपरी चिंचवड येथे डेबिट कार्डचा डेटा चोरून त्याद्वारे क्लोन कार्ड तयार करुन संबंधितांचे बँक खात्यातून पैसे चोरणारी आंतरराज्य टोळी कार्यरत असल्याचा संशय निर्माण झाला होता. त्याअनुषंगाने संबंधित तक्रारदार यांचेकडे अधिक चौकशी करून तसेच त्यांचे डेबिट कार्ड वापराचे विश्लेषण करुन त्यांचे डेबिट कार्डचा डेटा चोरीस गेला असल्याची संशयास्पद ठिकाणे सायबर सेलने शोधली होती.

दि.०२/०१/२०२१ रोजी फिर्यादी नामे उमेश आन्वेकर यांचे डेबिट कार्डचा डेटा चोरून त्यांची पिन वापरून त्यांचे खात्यावरून एकुण ५०,०००/- रु. पटना, बिहार येथून चोरीस गेल्याने त्यांचे फिर्यादीवरून भोसरी पो. स्टे. येथे गु.रजि. नं. १०/२०२१ भा.द.वि. कलम ३७९, सह माहिती तंत्रज्ञान अधिनीयम २००० चे कलम ४३ सह ६६, ६६(सी), ६६(डी) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. यात भोसरी येथील एका बार रेस्टॉरंटमध्ये वेटर म्हणून काम करणारा इसम नामे निखील पाटील वय-२३ वर्षे रा. देवास, मध्यप्रदेश यास सायबर सेलचे स.पो.नि. सागर पानमंद, पो.शि.२५६३ अतुल लोखंडे व पो.शि. २५०२ भास्कर भारती यांचे पथकाने संबंधित हॉटेलमधून संशयीत म्हणून ताब्यात घेऊन त्यास भोसरी पोलीस स्टेशनचे ताब्यात दिले होते. त्याचेकडून भोसरी पो. स्टे. चे तपास अधिकारी श्री. राजेंद्र कदम, पोलीस निरीक्षक यांनी एक डेबिट कार्ड स्किमर व इतर साहीत्य जप्त केले आहे.

आरोपी नामे निखील पाटील याचेकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे तो डेबिट कार्ड स्किमरचा डेटा पुढे इसम नामे खालीद अन्सारी वय- २७ वर्षे, रा. धानोरी गावठाण, मारुती मंदिराजवळ, धानोरी मुळ रा- टटकजोरी, करंजो, देवघर, झारखंड यास देत होता. जो सदरचा डेटा घेऊन बिहार येथे त्याच्या इतर साथीदारांना पाठवून त्या डेटाच्या आधारे क्लोन डेबिट कार्ड बनवून ग्राहकांचे खात्यातून बिहार येथे पैसे काढत होते. सदर खालीद अन्सारी याचा शोध घेऊन त्यास दि. १०/०१/२०२१ रोजी दिघी रोड, भोसरी येथून ताब्यात घेऊन पुढील कार्यवाहीकामी भोसरी पो.स्टे. च्या ताब्यात देण्यात आले. त्याचेकडून एक लॅपटॉप आणि एक डेबिट कार्ड स्किमर जप्त करण्यात आले आहे.

याच पद्धतीचा एक गुन्हा फिर्यादी नामे आकाश खोकर यांचे फिर्यादीवरून दि.११/०१/२०२१ रोजी वाकड पो. स्टे. येथे गु.र.नं. ३९/२०२१ भा.द.वि. कलम ३७९ सह माहिती तंत्रज्ञान अधि. २००० चे कलम ४३ सह ६६, ६६(सी), ६६(डी) अन्वये दाखल करण्यात आला असून फिर्यादी

आकाश खोकर याचे क्लोन डेबिटकार्डद्वारे १५,९००/- रु. रांची, झारखंड येथून काढण्यात आले होते. भोसरी पो.स्टे. ताब्यात दिलेला संशयीत नामे खालीद अन्सारी याचेकडून मिळालेली माहिती आणि संबंधित फिर्यादी यांनी सायबर सेल येथे दिलेली तक्रार यातील त्यांचे बँकेचे स्टेटमेंटचे विश्लेषण करुन औंध - वाकड रोड वरील विशालनगर येथील रेस्टॉरंट बारमधून दोन संशयीत नामे सद्दाम हुसेन वय-२९ वर्षे, रा. चोंदे बिल्डींग, विशालनगर, पिंपळे निलख, पुणे. मुळ- रा- झारखंड व फुरकान अन्सारी वय-३२ वर्षे, चोंदे बिल्डींग, विशालनगर, पिंपळे निलख, पुणे. मुळ- रा- झारखंड यांना सायबर सेलचे स.पो.नि. सागर पानमंद, पो.शि.लोखंडे, पो.शि. भारती, पो.शि. बिच्चेवार व वाकड पो.स्टे. कडील पो.शि. खराडे यांचे पथकाने ताब्यात घेऊन त्यांना वाकड पो.स्टे. चे ताब्यात दिले. दोन्ही संशयीताकडून मिळून एकूण ०३ डेबिट कार्ड स्किमर, ०१ लॅपटॉप आणि ०१ पेनड्राईव्ह जप्त करण्यात आले आहे. दोन गुन्हयात मिळून पकडलेल्या एकुण ०४ आरोपींनी अंदाजे ५०० पेक्षा अधिक डेबिट कार्डचा डेटा चोरल्याचा संशय असून तो डेटा बिहार आणि झारखंड येथे कसा पाठविला तसेच त्यांचे इतर साथीदार कोण आहेत याबाबत अधिक तपास सायबर सेल करत आहे.

सदरची कामगिरी पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त मा.श्री.कृष्ण प्रकाश सो, अपर पोलीस आयुक्त मा.श्री. रामनाथ पोकळे सो, पोलीस उप आयुक्त मा.श्री. सुधीर हिरेमठ सो, सहा. पोलीस आयुक्त प्रेरणा कट्टे व वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय तुंगार, सायबर सेल यांच्या मार्गदर्शनाखाली सहा पो.नि. सागर पानमंद, पोलीस अंमलदार अतुल लोखंडे, भास्कर भारती, नितेश बिचेवार यांचे पथकाने केली आहे.

**नागरिकांनी कार्ड क्लोन होऊ नये म्हणून घ्यावयाच्या दक्षताः-**

१) हॉटेल, पेट्रोल पंप, मॉल, दुकान किंवा इतर पी.ओ.एस. असणा-या ठिकाणी आपले डेबिट/क्रेडीट कार्ड आपल्या समोरच स्वाईप करण्याची मागणी करा. ते तुमच्या नजरेआड होऊ देऊ नका.

२) ए.टी.एम. सेंटरमध्ये जाऊन आपले कार्ड वापरण्यापुर्वी तेथे एखादा कार्ड स्किमिंग स्लॉट लावला आहे का याची खात्री करा.

३) पी.ओ.एस. असेल किंवा ए.टी.एम. सेंटरमध्ये आपला पिन दाखल करताना संबंधित मशिनचा की बोर्ड एका हाताने झाकून घ्या म्हणजे तो गोपनीय राहिल.

४) आपल्या कार्डद्वारे बिल पे करण्याकरीता ते इतरांचे ताब्यात देऊन त्यांना कार्डचा पिन सांगू नका.

५) हॉटेल मालकांनी आपल्याकडे काम करणारे वेटर वर लक्ष ठेवावे जेणे करुन ते बेकायदेशीर कृत्यात सहभागी होणार नाहीत.

**(डॉ. संजय तुंगार)**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
सायबर सेल, गुन्हे शाखा
पिंपरी चिंचवड